महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३०८ वे | दिनांक : ०५/११/२०२६ | वार : गुरूवार

खासदारांमधील भाऊ-बहिणीच्या संवादाचे विकृतीकरण : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ



मुंबई : दिल्लीतील आंदोलनादरम्यान काँग्रेस खासदारांच्या बसमधील व्हिडीओवर चालवल्या जाणाऱ्या अपप्रचाराचा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी तीव्र शब्दांत समाचार घेतला आहे. "खासदार श्यामकुमार बर्वे आणि प्रतिभा धानोरकर यांच्यातील नाते हे सख्ख्या बहीण-भावासारखे पवित्र आहे. एका कौटुंबिक आणि खेळीमेळीच्या संवादातील अवघ्या अर्ध्या सेकंदाचा व्हिडीओ क्रॉप करून भाजपने आपल्या बौद्धिक दिवाळखोरीचे प्रदर्शन घडवले आहे. रामलीला मैदानावरील महाप्रचंड रॅली आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर उठलेल्या प्रश्नांवरून जनतेचे लक्ष भरकटवण्यासाठीच भाजपने ही विकृत टूलकिट चालवली असून, त्यांनी देशाची माफी मागितली पाहिजे," असा घणाघात सपकाळ यांनी केला.

टिळक भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपच्या कारभारावर प्रश्नांची सरबत्ती केली. शेतकऱ्यांना जाहीर केलेली ५,००० रुपयांची तुटपुंजी मदत, 'गोकुळ' दूध संघावर ४ स्वीकृत सदस्य लादण्याचा असंवैधानिक निर्णय, कोकणातील संघटनात्मक पुनर्बांधणी आणि भाजपसोबत सत्तेत असलेल्या मित्रपक्षांची लाचारी यावर त्यांनी भाष्य केले.

बस प्रवासातील व्हायरल व्हिडीओवर काँग्रेसची अधिकृत भूमिका स्पष्ट करताना सपकाळ म्हणाले, "सकाळपासून भाजपने एक विकृत टूलकिट चालवली की मारले, मारले, अभद्र वर्तन केले, गुंडगिरी केली. मुळात हा व्हिडीओ काँग्रेस खासदारांनीच सोशल मीडियावर पोस्ट केला होता. तो अर्ध्या सेकंदापेक्षा कमी भाग क्रॉप करून सिलेक्टिव्ह पद्धतीने चालवण्यात आला. राजकारणात विषय डायव्हर्ट करण्यासाठी भाजप किती खालच्या पातळीवर जाऊ शकते, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे."

"दोन्ही खासदारांचे मतदारसंघ जवळचे असून ते एकमेकांना भाऊ-बहीण मानतात. आपल्या घरांमध्येही अशी टपली मारणे किंवा थट्टा-मस्करीचा संवाद स्वाभाविक असतो. एका बहिणीशी केलेल्या संवादाला महिलांशी गैरवर्तन ठरवणे हे भाजपच्या विकृत मानसिकतेचे लक्षण आहे."

"काँग्रेसच्या कोणत्याही नेत्याने किंवा कार्यकर्त्याने अशी कोणतीही तक्रार पाठवलेली नाही. हा बेनामी आणि फेक ईमेल आहे. खोटे बोला, रेटून बोला या नीतीचा वापर करून बदनामी करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याबाबत काँग्रेस पक्ष कायदेशीर सल्ला घेत आहे."

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीवरून त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर कडक शब्दांत ताशेरे ओढले, "गेल्या ९० दिवसांपासून राज्यात पाऊस नाही, शेतकऱ्यांनी खिशातले सर्व भांडवल जमिनीत ओतले, डोळ्यांदेखत पिके करपून वाळली. अशा गंभीर संकटात शेतकऱ्यांना अवघे ५,००० रुपये देऊन त्यांची क्रूर थट्टा केली जात आहे. फडणवीसांनी स्वतः ५,००० रुपयांत आपल्या घरी दिवाळी साजरी करून दाखवावी. काँग्रेस शेतकऱ्यांसाठी हेक्टरी १ लाख रुपयांच्या सानुग्रह अनुदानाची आग्रही मागणी करत आहे. तुटपुंजे ५,००० रुपये देऊन स्वतःचीच पाठ स्वतः थोपटून घेणाऱ्या सत्ताधाऱ्यांची कीव करावीशी वाटते."

कोल्हापूरच्या 'गोकुळ' दूध संघावर मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयावर सपकाळ यांनी थेट आव्हान दिले. "गोकुळ निवडणुकीत सतेज पाटील यांच्या नेतृत्वाला साडेपाच लाख शेतकऱ्यांनी स्पष्ट बहुमत दिले आहे. मात्र 'सर्व विरुद्ध एक' अशी लढाई जिंकल्यानंतरही सत्ताधारी पराभव पचवू शकत नाहीत. स्वीकृत (Co-opted) सदस्यांना मतदानाचा अधिकार देणे पूर्णपणे घटनाबाह्य आणि राजधर्मबाह्य आहे. महापालिका किंवा नगरपालिकेतही स्वीकृत सदस्यांना मतदानाचा अधिकार नसताना गोकुळसाठी हा घाट का घातला गेला?"

मनोज जरांगेंच्या दारात SIT : ५०० कोटी ऑडिओ क्लिपच्या मूळ फाइलची मागणी



छत्रपती संभाजीनगर : मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान राजकीय वर्तुळात प्रचंड भूकंप घडवून आणणाऱ्या कथित ५०० कोटी रुपयांच्या देवाणघेवाणीच्या ऑडिओ क्लिप प्रकरणात आता तपास यंत्रणांनी थेट आक्रमक पावले उचलली आहेत. या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी राज्य शासनाने नेमलेली विशेष तपास पथकाची (SIT) टीम थेट मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यापर्यंत पोहोचली असून, त्यांनी जरांगे यांच्याकडे संबंधित ऑडिओ क्लिपची मूळ प्रत देण्याची अधिकृत मागणी केली आहे. यावर मनोज जरांगे पाटील यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत ऑडिओ क्लिप तपास पथकाला सोपवण्याची पूर्ण तयारी दर्शवली आहे. मात्र, "मी क्लिपसोबतच तिचा खरा 'सोर्स'ही (स्रोत) जाहीर करेन, परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ती क्लिप देणाऱ्या व्यक्तीच्या जीविताला कोणताही धोका होणार नाही, याची १००% लेखी शाश्वती द्यावी," अशी अत्यंत कडक व महत्त्वपूर्ण अट जरांगे यांनी सरकारसमोर ठेवली आहे.

कथित ५०० कोटींच्या ऑडिओ क्लिपवरून सत्ताधारी महायुतीमध्येच मोठा अंतर्गत कलगीतुरा रंगल्यानंतर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुंबई पोलीस आयुक्तांना तात्काळ चौकशीचे आदेश दिले होते. मुंबई पोलिसांचे गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे यांच्या अध्यक्षतेखाली 3 वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली त्रिस्तरीय एसआयटी (SIT) गठीत करण्यात आली आहे.

एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्याशी संपर्क साधून त्यांना अधिकृत पत्र दिले आहे. पत्रकार परिषदेत ऐकवण्यात आलेल्या संभाषणाची संपूर्ण ऑडिओ क्लिप, तिचा मूळ डेटा आणि डिजिटल पुरावे तपास यंत्रणेकडे सादर करण्याची विनंती या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत एका फोन संभाषणाची ऑडिओ क्लिप ऐकवून खळबळ उडवून दिली होती. या ऑडिओ क्लिपमध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून मनोज जरांगे यांना 500 कोटी रुपये देण्यात आल्याचा खळबळजनक दावा करण्यात आला होता.

"मला ५०० कोटी रुपये दिले असे भासवून भाजप किंवा सत्ताधाऱ्यांकडून कोणी मध्यस्थाने पैसे लाटले का? मला खरंच एक रुपया तरी मिळाला आहे का?" असा सवाल उपस्थित करत जरांगे यांनी यामागील खरा सूत्रधार शोधण्यासाठी उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली होती. या दाव्यानंतर भाजप आणि शिंदे गटात आरोप-प्रत्यारोपांची राळ उडाली होती.

एसआयटीच्या पत्रानंतर माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी तपासात पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले, मात्र संरक्षणाचा मुद्दा लावून धरला. "मला या प्रकरणाचा पूर्ण सोक्षमोक्ष लावायचा आहे. त्यामुळे एसआयटीला ऑडिओ क्लिप देण्यास माझी कोणतीही हरकत नाही. ही क्लिप माझ्याकडे कुठून आली, कोणामार्फत आली, याचा मूळ सोर्सही मी तपास अधिकाऱ्यांना सांगेन."

"पण सर्वात महत्त्वाची अट ही आहे की, ज्या व्यक्तीने हे धाडस करून हा ऑडिओ समोर आणला, त्याच्या जीविताचे रक्षण करण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घ्यावी. त्याला अथवा त्याच्या कुटुंबाला काहीही होणार नाही, याची पक्की खात्री सरकारने दिली पाहिजे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून ५०० कोटींचा खेळखंडोबा करणाऱ्या मुख्य सूत्रधाराचा बुरखा टराटरा फाडलाच पाहिजे," असा पुनरुच्चार जरांगे यांनी केला.

आता एसआयटी या ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक तपासणी कशी करणार आणि जरांगे पाटील नेमका कोणाचा पर्दाफाश करणार, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

वाहनधारकांसाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय : थकीत वाहतूक दंडावर मिळणार २०% पर्यंत सवलत

मुंबई : वाहतुकीचे नियम मोडल्यामुळे वाहनांवर आकारण्यात आलेला दंड अनेकदा वाहनधारकांकडून भरला जात नाही. कधी दंडाची मोठी रक्कम, तर कधी दंड भरण्याची प्रक्रिया यामुळे अनेक वाहनांवरील चलन वर्षानुवर्षे प्रलंबित राहते. अशा वाहनधारकांना आता राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. महाराष्ट्र सरकारने प्रलंबित वाहतूक दंडाच्या वसुलीसाठी 'महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलन अभय योजना-२०२६' लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेमुळे थकीत चलन भरणाऱ्या वाहनधारकांना दंडाच्या रकमेवर एकवेळची बाब म्हणून २० टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली चलनाची थकबाकी भरून वाहनधारकांना दिलासा मिळू शकणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक आज मुंबईतील मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच विविध खात्यांचे मंत्री उपस्थित होते. राज्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विविध विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीत एकूण १२ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये वाहनधारकांसाठी अभय योजना लागू करण्याच्या निर्णयाचाही समावेश आहे.

शहरांमध्ये तसेच महामार्गांवर वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर वाहतूक पोलिसांकडून दंडात्मक कारवाई केली जाते. सिग्नल तोडणे, नो एन्ट्रीमध्ये वाहन नेणे, निर्धारित वेगमर्यादेपेक्षा अधिक वेगाने वाहन चालवणे, हेल्मेट किंवा सीटबेल्टचा वापर न करणे, चुकीच्या ठिकाणी पार्किंग करणे अशा विविध नियमभंगांसाठी ई-चलन किंवा प्रत्यक्ष दंड आकारला जातो.

मात्र, अनेकदा वाहनधारकांना आकारण्यात आलेला दंड वेळेत भरला जात नाही. काही वाहनधारकांकडे अनेक चलने जमा झालेली असतात. त्यामुळे एकत्रित दंडाची रक्कम मोठी होते. परिणामी, दंड भरणे टाळले जाते आणि महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलन अभय योजना-२०२६ अंतर्गत वाहनधारकांना त्यांच्या वाहनावर प्रलंबित असलेल्या दंडाच्या रकमेवर एकवेळची सवलत दिली जाणार आहे. या योजनेनुसार पात्र प्रलंबित चलनांच्या दंडाच्या रकमेवर २० टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. त्यामुळे वाहनधारकांना पूर्ण दंड भरण्याऐवजी सवलतीच्या रकमेत थकबाकी भरता येणार आहे.

या निर्णयाचा मुख्य उद्देश प्रलंबित चलनांची वसुली करणे आणि वाहनधारकांवरील थकबाकीचा भार कमी करणे हा आहे. अनेक वाहनधारकांना दंडाची रक्कम मोठी असल्यामुळे ती भरणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत सवलतीच्या माध्यमातून दंड भरण्याची संधी उपलब्ध झाल्यास अधिकाधिक वाहनधारक पुढे येऊ शकतात. त्याचबरोबर वाहतूक विभागाकडे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या चलनांचा निपटारा होण्यासही मदत होऊ शकते.

दरम्यान, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील ज्या सहकारी संस्थांची वार्षिक उलाढाल ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे, अशा संस्थांच्या संचालक मंडळात शासनाकडून नामनिर्देशित पाच सदस्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या पाच सदस्यांपैकी एका अधिकाऱ्याला मतदानाचा अधिकार असणार नाही, तर उर्वरित चार सदस्यांना संचालक मंडळात मतदानाचा अधिकार असेल. मात्र, या शासन नामनिर्देशित सदस्यांना संबंधित संस्थेच्या पदाधिकारीपदाच्या निवडणुकीत सहभागी होता येणार नाही. राज्यातील मोठ्या आर्थिक उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांच्या कामकाजात शासनाचा सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ नोव्हेंबर २०२६

दौलताबाद येथे हरीकीर्तन सोहळ्याचे आयोजन



दौलताबाद (जावेद अहमद) : शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज यांचे सद्गुरू संत जनार्दन स्वामी महाराज यांच्या पावन भूमी दौलताबाद येथे अश्विन वद्य रमा एकादशीनिमित्त गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी हरीकीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.भागवत आश्रमात रात्री ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. वारकरी भूषण ज्ञानेश्वर महाराज राऊत (सद्गुरू श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची) यांची कीर्तनसेवा होणार आहे. यानिमित्त दिवसभर भजन, नामचिंतन, साधना, सायंकाळी हरिपाठ व रात्री कीर्तनाचा कार्यक्रम होईल. भाविकांनी कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

विद्यार्थ्यांसाठी दिवाळीआधी सरकारची मोठी भेट : ओबीसी विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात दुपटीहून अधिक वाढ

मुंबई : शिक्षणासाठी घरापासून दूर राहून वसतिगृहात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. इतर मागासवर्गीय (ओबीसी), विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात दुपटीहून अधिक वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. विभागीय आणि जिल्हास्तरीय वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना आता वाढीव निर्वाह भत्ता मिळणार आहे.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत विद्यार्थी कल्याणासह कृषी, पशुसंवर्धन, न्यायव्यवस्था आणि सर्वसामान्य नागरिकांशी संबंधित अनेक निर्णय घेण्यात आले. यामध्ये वसतिगृहात राहणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात वाढ करण्याच्या निर्णयाकडे विशेष लक्ष वेधले जात आहे. शिक्षणासाठी कुटुंबापासून दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दैनंदिन खर्चाचा विचार करून सरकारने हा निर्णय घेतला आहे. ओबीसी मंत्री अतुल सावे यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली.

राज्य सरकारच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विविध प्रवर्गांतील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह योजना राबवली जाते. या योजनेंतर्गत वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच दैनंदिन गरजा भागवण्यासाठी निर्वाह भत्ता दिला जातो. मात्र, वाढत्या महागाईमुळे विद्यार्थ्यांचा भोजन, प्रवास, शैक्षणिक साहित्य आणि इतर आवश्यक खर्च वाढला आहे. त्यामुळे निर्वाह भत्त्यात वाढ करण्याची मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाने निर्वाह भत्ता वाढवण्यास मंजुरी दिली आहे. नव्या निर्णयानुसार विभागीय स्तरावरील शासकीय वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना आता दरमहा १,५०० रुपये निर्वाह भत्ता मिळणार आहे. तर जिल्हास्तरीय वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा १,३०० रुपये दिले जाणार आहेत. यापूर्वीच्या तुलनेत हा भत्ता दुपटीहून अधिक करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळणार आहे.

राज्य सरकारच्या या निर्णयाचा लाभ इतर मागासवर्गीय (ओबीसी), विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना होणार आहे. या प्रवर्गातील जे विद्यार्थी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वसतिगृह योजनेअंतर्गत वसतिगृहात राहून शिक्षण घेत आहेत, त्यांना वाढीव निर्वाह भत्ता मिळेल.

विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातून शहरांमध्ये उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. कुटुंबापासून दूर राहून शिक्षण घेताना निवास, भोजन आणि शैक्षणिक खर्चाचा मोठा भार विद्यार्थ्यांवर असतो. वाढीव निर्वाह भत्त्यामुळे त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी काही प्रमाणात आर्थिक आधार मिळेल. तसेच पालकांवरील आर्थिक भारही कमी होण्यास मदत होईल.

सकारात्मक दृष्टीकोण ठेवल्यास यश तुमच्या हातात आहे - यशवंतराव बिरादार



उदगीर (प्रतिनिधी) : प्रत्येकाला आपल्या आयुष्यात यश हवं असतं. त्यासाठी परिस्थितीनुरूप स्वतःला बदलून घेण्याची इच्छा देखील असते. परंतु प्रत्यक्ष तसं करणे किंवा त्यात सातत्य राखणे कठीण जाते. जर तुम्ही सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कार्य करत राहिलो तर यश तुमच्या हातात असेल असे मत यशवंतराव बिरादार यांनी व्यक्त केले. गेल्या सोळा वर्षापासून चालू असलेल्या चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत वाचक संवादाचे ३७२ वे पुष्पा मा. गटशिक्षणाधिकारी बालाजी बिरादार यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक यशवंतराव बिरादार यांनी शिव खेरा लिखित यश तुमच्या हातात या साहित्यकृतीवर संवाद साधून गुंफले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, आपल्या विचार प्रणालीतील स्फूर्ती दायक तत्त्वज्ञान, व्यवहारी दृष्टिकोन आणि त्यावरील श्रद्धा याचे स्वयं मूल्यमापन करून व्यक्तिगत विकास आणि ध्येयपूर्तीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी लेखक शिव खेरा यांनी दृष्टिकोनाचे महत्त्व, यश, प्रेरणा, आत्म प्रतिष्ठा, संवाद कौशल्य, मन आणि सवयी, ध्येय, नीतीमूल्ये आणि दृष्टिकोन अशा एकूण आठ प्रकरणाच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन या पुस्तकातून केलेले आहे.

यावेळी झालेल्या चर्चेत अनेकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यानंतर उपस्थितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट देण्यात आली. शेवटी अध्यक्षीय समारोपात बालाजी बिरादार म्हणाले की, यशस्वी होणे याचा अर्थ कधीही अपयश न मिळणे असा नसून अंतिम ध्येय गाठण असा आहे. उच्च यश प्राप्तीची जिद्द बाळगणाऱ्यांसाठी हे पुस्तक अत्यंत महत्त्वाचे आहे.

यावेळी एम एस डिग्री प्राप्त करून डॉक्टर बनलेल्या डॉ. ऋतुजा अंबुलगे हिचा यथोचित असा सत्कार करण्यात आला. सर्वांसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या वाचक संवाद या कार्यक्रमास चंद्रकांत भुरे, दिगंबरराव देशपांडे, डॉ. संजीवनी भातांबरे, व्यंकटराव चिट्टे, पत्रकार रामविलास नावंदर, सिद्धेश्वर मोरे, श्रीराम काकडे, प्राचार्य डॉ.नामदेव खंडगावे, डॉ.नरेंद्र शिंदे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीरभद्र स्वामी यांनी केले तर संवादकांचा परिचय तुळशीदास बिरादार यांनी करून दिला. शेवटी आभार गोविंद सावरगावे यांनी मांडले.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ नोव्हेंबर २०२६

"शांतता"... दीपावली फराळाचे पदार्थ करायला सुरु असताना..!

पुरुष लोकांच्यासाठी अतिशय महत्त्वाचा व विचार करायला लावणारा असा दीपावली धमाका आहे. दीपावली साजरी करत असताना घरातील स्वछता,रांगोळी,पुजापाठ ते फराळासाठी लागणारी पुर्वतयारी ते पै पाहुण्याची सरबराई करत असताना घरच्या लक्ष्मीची होणारी दमछाक किती व काय असते हेच यातुन दिसुन येते.पुरुष मंडळीनी आपल्या भल्यासाठी सावधानता बाळगावी व काय बोध घ्यावा हे समजते. ☑ बायको फराळ करत असतांना सोफ्यावर पाय पसरून मॅच बघू नका ..☑ मोबाईल शक्यतो लांब ठेवा , रिल्स बघण्याची तर हा वेळ अजिबातच नाही ....धोका पत्करू नका ...☑ एका जागेवर जास्त वेळ बसू नका. या मुळे आपण काहीच काम करत नाही हे लक्ष्यात आल्यास एखादे काम पदरी पडेल ...☑ एखादे काम मिळाल्यास खूप वेळ लावा. डब्यात काही भरून द्यायचे असेल तर सांडलवण केल्याशिवाय भरू नका ...☑ उगाचच या रूम मधून त्या रुम मध्ये जा. जे काम सांगितले जाईल तेच करा. स्वतः चे डोके वापरू नका ...☑ चव बघायला मिळेल तेव्हा चेहऱ्यावरचे भाव बदलत चव बघा .. निर्विकार चेहऱ्याने चव बघू नका ... सगळीच चव घालवाल ...चव बघतांना,- थोडं मीठ कमी वाटतंय ...- जरा तिखट पाहिजे ...असा अभिप्राय द्या.सगळंच छान झालंय ...असं एकदम म्हणू नका.☑ मी काही मदत करू का ? हे वाक्य दिवसा कमीत कमी ताशी चार वेळा तरी म्हणा ...😊☑ किती दमतेस तू ... हे वाक्य वेळ पाहून म्हणा.आणि अतिरिक्त पॉईंट्स मिळवा.लाइटिंग च्या माळेचा गुंता खूप वेळ सोडवत बसा ...☑ बाहेरचे काम सांगितले कि जरा जास्त वेळ घ्या आणि घरी आल्यावर किती ऊन होते, ट्रॅफिक खूप होती ... हे सांगतांना दमलो आहे असा अभिनय करता करता पाणी प्या ...☑ बायको कोठे बाहेर गेली असेल, घरात नसेल तर अजिबात कोणत्याही कामाला हात लावू नका...तिच्या अनुपस्थितीत तुम्ही कितीही कामं केली,तरी ती कामं, काम म्हणून पकडली जात नाही... जे तिच्या डोळ्यांना दिसतं तेच काम...☹- सिलेंडर बदलणे,- माळ्यावरून मोठे पातेले काढणे,- घट्ट झाकण उघडणे,- किराणा लावणे,- फर्निचर सरकवणे,ही सगळी अत्यंत अवघड कामे आहेत असा अभिनय करा ...☑ मित्रां बरोबर पार्ट्यांची हि वेळ नाही...जरा धीर धरा ...☑ सोन्या चांदीच्या दुकाना जवळून गाडी जोरात घ्या.☑ प्रत्येक गोष्टीला,- हो ...- चालेल ...- बरं ठीक आहे ...- घेऊया आपण ...हे असे म्हणत रहा.☑ या वेळी बायकोचा मूड हा सेन्सेक्स सारखा असतो खूप उतार चढाव होऊ शकतात. तो अपट्रेन्ड मध्ये असेल तर फायदा करून घ्या आणि डाऊन ट्रेंड मध्ये असेल तर अजिबात रिस्क घेऊ नका . ☑ तिने केलेल्या फराळाची तुलना कोणाशीही करू नका. संध्याकाळी बाहेर जेवायला जा किंवा ऑर्डर करा.☑ आणि सगळ्यात महत्वाचे स्वतः शहाणपणा करून तुम्ही बायकोला खूष करण्यासाठी स्वतः दोन, तीन, पाच हजार रुपयेची साडी घेऊन येऊ नका. तुमची घरवाली त्या साडीची किंमत चारशे ते साडे चारशे रुपये इतकीच किंमत करेल . शक्यतो हया साडी विकत घेण्याच्या झंझट मध्ये पडू नये. तिच्या हातात पैसे देऊन मोकळं व्हा.. हा लेख पुरुषासाठीशुभ दीपावली



संकलन
सौ. मिरा अरुणराव केळगावकर
ता. निलंगा जि. लातुर

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात डॉ. इं. भा. पाठक महाविद्यालयाची यशस्वी कामगिरी



छत्रपती संभाजीनगर : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवात येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले. लोकगीत (समूहगायन) स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले, तर कवितालेखन स्पर्धेत महाविद्यालयाची विद्यार्थिनी राधिका दैठणकर हिने प्रथम क्रमांक मिळवला.लोकगीत (समूहगायन) स्पर्धेत स्नेहल दिवाकर, अमृता गायके, अक्षरा गायके, राधिका दैठणकर, आदिती काळे, रिद्धी रत्नपारखी, भार्गवी मोदी, प्रीती देशमुख आणि नंदकिशोर हतागंळे यांनी सहभाग नोंदविला. समूहगायनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी लोकसंगीताचा सांस्कृतिक वारसा प्रभावीपणे सादर केला. त्यांच्या सांघिक सादरीकरणाला परीक्षकांकडून तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.या स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना प्रा. शंकर विधाते यांनी मार्गदर्शन केले, तर डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी आवश्यक सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्या सांस्कृतिक व साहित्यिक अभिव्यक्तीला व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या दृष्टीने केलेल्या प्रयत्नांना या यशामुळे सकारात्मक फलित मिळाले आहे.या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल यांनी सर्व सहभागी व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस सदिच्छा दिल्या.

सत्ता असो व नसो आमच्या हातुन देशाची, जगाची, मानवतेची, पशुप्रेमाची सेवा हीच आमचे ध्येय- आदित्य ठाकरे



दौलताबाद (जावेद अहमद) : भांगशी माता गडावर पाच कोटीचे सत्संग सभागृहाचे लोकार्पण सोहळा आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत संपन्न भांगशी माता गड येथे पाच कोटी रुपयांचे सत्संग सभागृहाचे मंगळवारी शिवसेना (उबाठा)नेते माजी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले माजी विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या विशेष प्रयत्नातून याचे काम करण्यात आले आहेतत्कालीन पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या निधीतून याचे काम करण्यात आले आहे. यावेळी आदित्य ठाकरे यांनी शेतकऱ्यांना धीर देत सध्या दुष्काळा परिस्थिती मी पाहणी केली असून फार गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे याचे चूक होत आहे अनेक जंगले तोडली जात आहे यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे आपल्याला याचे सामना करावा लागेल असे त्यांनी सांगितलेमहामंडलेश्वर १००८ परमानंद गिरी महाराज यांनी सांगितले आदित्य ठाकरे यांच्या मनात साधुसंत यांच्या बद्दल खूप आदर आहे पर्यटन मंत्री असताना भूमिपूजन ला आले होते तेव्हा ते स्वत साधू संता सोबत जमिनीवर बसले होते याची आठवण करून दिलीयावेळी महामंडलेश्वर परमानंद गिरी महाराज, आमदार अंबादास दानवे, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, उपनेते सुभाष पाटील, माजी आमदार उदयसिंह राजपूत, व्यवस्थापक सांडू पवार, शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला पदाधिकारी उपस्थित होते

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact : 9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ नोव्हेंबर २०२६

पावसाने हजेरी लावावे!

रब्बी पेरणीच्या हंगामात
मेघराजा रुसून बसला.
भेगाळलेल्या जमिनीस,
पाहून का वरून हसला. १

भेगाळलेल्या जमिनीतून,
आता अंकुर कसे उगवेल.
पाण्या पावसाविना बाप,
शेतात पीक कसे पिकवेल. २

शेत-शिवारात पाखरांचे,
थवे दिसत नाही दूरदूर.
आता वाटते बळीराजाला,
पावसाने करू नये मजबूर. ३

हात जोडूनी करतो विनंती,
मेघराजा आतातरी तू धाव.
मेटाकुटीस आलेल्या बापाला,
जोरदार पाऊस पाडून पाव. ४

काळ्या माईच्या प्रेमापोटी,
पावसाने हजेरी लावावे.
जगाचे पोट भरण्यासाठी,
आता लगबगीने तू धावावे. ५

मेघराजा तू रुसून बसून,
करू नको जगाचे हाल.
बळीराजाच्या शेतामध्ये,
पिकू दे खंडी खंडी माल. ६



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

वाल्मिक साहेब



गावात मोठ मोठे वाडे आहेत. गाव वाड्यात विभागलेलं आहे. मोठा वाडा, लहाना वाडा, नागऱ्याचा वाडा, इटाचा वाडा. प्रत्येक वाड्याला एक इतिहास आहे, एक परंपरा आहे आणि एक वेगळी प्रतिष्ठा मिळालेली आहे. पूर्वीच्या काळी जमिनदार घराणी हीच गावाची ओळख होती. त्यांच्या वाड्यावरूनच गावातील वस्त्यांची नावे पडलेली असायची. गावाच्या मध्यभागी असलेला आमचा इटाचा वाडा हा असाच एक मानाचा आणि जुना वाडा. या वाड्याची भिंत, या वाड्याचे लाकडी दरवाजे, या वाड्यातील चावडी आजही त्या काळातील वैभवाची साक्ष देतात. त्या इटाच्या वाड्यात श्रीधरराव पा. हुसे हे एक मोठी आसामी म्हणून ओळखले जात होते. त्यांची शेती मोठी, त्यांचा शब्द मोठा. त्यांना तीन मुले होती आणि त्यापैकीच एक म्हणजे वाल्मिकराव.वाल्मिकरावांचे बालपण याच इटाच्या वाड्यात गेले. वाड्यातील संस्कार, शेतीची आवड आणि मोठ्या घराण्याची शिस्त त्यांच्यावर लहानपणापासूनच होती. त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर बहुतेक तरुण नोकरीच्या शोधात शहराकडे धाव घेतात, पण वाल्मिकरावांनी वेगळा मार्ग निवडला. ते गावातच थांबले आणि शेती करू लागले. वडिलांची शेती, घरची शेती ते मन लावून करू लागले. काळ कठीण होता, शेतीत फारसे उत्पन्न नव्हते, पण त्यांनी हार मानली नाही. वय मात्र हळूहळू उलटून गेले होते. नोकरी मिळत नव्हती म्हणून अनेकजण त्यांना नावे ठेवत होते, पण ते आपल्या कामातच रमले होते. त्यांचा विश्वास होता की कष्ट कधीही वाया जात नाहीत. आणि अखेर तो दिवस आला. शेवटच्या टप्प्यात, जेव्हा नोकरीची आशाच संपली होती असे वाटत होते, तेव्हा त्यांना कृषी खात्यात नोकरी मिळाली.नोकरी मिळाली तरी त्यांनी आपला गाव सोडला नाही. अनेकजण नोकरी लागली की गाव सोडून शहरात स्थायिक होतात, पण वाल्मिकरावांनी गावाकडेच राहून नोकरी आणि शेती दोन्ही सांभाळण्याचा निर्णय घेतला. उंच व सडपातळ बांधा, अंगात पांढरी ईजार व पांढराच कुडता आणि डोक्यावर पांढरी टोपी असा त्यांचा पेहराव होता. हा पेहराव अतिशय साधा होता, पण त्यात एक वेगळाच रुबाब होता. नोकरीला लागले तरी त्यांचा पोशाख तसाच राहिला. आजकाल नोकरी लागली की माणूस कपडे बदलतो, बोलणे बदलतो, राहणीमान बदलतो, पण वाल्मिकरावांनी साधेपणा कधी सोडला नाही. अत्यंत साधेपणाने ते जीवन जगू लागले. गावातील सर्वच कार्यक्रमात ते आवर्जून सहभागी होत. गावात कुणाचे लग्न असो, कुणाच्या घरात कार्य असो, कुणाच्या घरात दुःख असो, वाल्मिकराव तिथे पहिले हजर असायचे. त्यांच्या या आपुलकीच्या स्वभावामुळे लोक त्यांना आदराने साहेब म्हणू लागले. हळूहळू त्यांचे वाल्मिकराव हे नाव मागे पडले आणि ते गावात व परिसरात वाल्मिक साहेब नावानेच ओळखले जाऊ लागले. असे ते आमचे वाल्मिक साहेब झाले.मोकळा स्वभाव, सरळ वागणे, कुणाच्याही मदतीला धावून जाणे हा त्यांचा स्थायीभाव होता. सर्वांशी मिळून मिसळून वागणारे असे ते व्यक्तिमत्व होते. त्यांच्याकडे कधीही गर्व नव्हता. मोठ्या वाड्यातले असूनही ते लहानात लहान माणसाशीही अगदी आपुलकीने बोलत. गावातील लोकांना जर विचारले की आज कुठे कामाला आहेस, तर ते लगेच म्हणत की वाल्मिक साहेबाकडे चाललो आहे. लोकांचा त्यांच्यावर एवढा विश्वास होता. शेतातले काम असो, घरातले काम असो, सरकारी काम असो, लोक थेट त्यांच्याकडेच येत. त्यांनी कधीही कुणाला विन्मुख पाठवले नाही. होईल तेवढी मदत ते करतच.कृषी खात्यात नोकरी लागल्यापासून त्यांनी आपले काम हे केवळ नोकरी म्हणून कधीच केले नाही, तर ती एक सेवा म्हणून केली. कृषी विस्तार अधिकारी म्हणून त्यांनी ठिक ठिकाणी नोकरी केली. त्यांच्या अनेक बदल्या झाल्या. कधी जवळ, कधी लांब, कधी डोंगराळ भागात, कधी दुष्काळी भागात त्यांना जावे लागले. पण तरीही त्यांनी आपले गाव कधी सोडले नाही. रोजचा लांबचा प्रवास करून त्यांनी नोकरी केली. सकाळी लवकर उठून शेतात चक्कर मारायची, मग बस पकडून नोकरीच्या ठिकाणी जायचे आणि संध्याकाळी परत येऊन पुन्हा शेतात जायचे, हा त्यांचा दिनक्रम होता. कृषी विस्तार अधिकारी म्हणून त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन काम केले. शासनाच्या नवीन योजना, नवीन बियाणे, नवीन खते, कीड नियंत्रण, पाणी व्यवस्थापन याची माहिती ते शेतकऱ्यांना त्यांच्या भाषेत समजावून सांगत. अनेक शेतकऱ्यांना त्यांनी कर्ज मिळवून दिले, अनेकांना अनुदान मिळवून दिले. त्यांच्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे संसार उभे राहिले.नोकरी सांभाळून त्यांनी आपली शेतीही अतिशय चांगली विकसित केली. केवळ वडिलोपार्जित पद्धतीनेच शेती न करता त्यात त्यांनी नवनवीन प्रयोग केले. कृषी खात्यात असल्यामुळे जे ज्ञान त्यांना मिळत होते, ते ते आधी आपल्या शेतात वापरून पाहत आणि मग इतर शेतकऱ्यांना सांगत. त्यामुळे त्यांच्या शेताकडे एक आदर्श शेत म्हणून पाहिले जाऊ लागले. पुढे ते कृषी विस्तार अधिकारी म्हणूनच सेवानिवृत्त झाले. संपूर्ण सेवा त्यांनी प्रामाणिकपणे पूर्ण केली.सेवानिवृत्त झाल्यावर अनेकजण घरी आराम करतात, पण वाल्मिक साहेब शांत बसणारे नव्हते. गावाने त्यांना पुन्हा एक जबाबदारी दिली. गावच्या विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे त्यांना चेअरमन करण्यात आले. चेअरमन म्हणूनही त्यांनी कधीही भेदभाव केला नाही. गरीब असो वा श्रीमंत, सर्वांना समान न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी अनेक गरजू शेतकऱ्यांना मदत केली. त्यांच्या घरावर गावाचा असलेला विश्वास एवढा मोठा होता की त्यांची सूनही गावची सरपंच झाली. हा केवळ योगायोग नव्हता, तर त्यांनी घरात रुजवलेल्या सेवाभावाचा आणि प्रामाणिकपणाचा तो परिणाम होता. त्यांची मुले शिकली, मोठी झाली, चांगल्या नोकऱ्यांना लागली. प्रत्येक मुलावर त्यांनी चांगले संस्कार केले. पैशापेक्षा माणुसकी मोठी असते, हेच त्यांनी आपल्या मुलांना शिकवले.सध्या वाल्मिक साहेब मुलाकडे छत्रपती संभाजीनगरात राहतात. वय झाले आहे, तब्येत आता पूर्वीसारखी साथ देत नाही. शहरात राहत असले तरी त्यांचे सारे लक्ष गावाकडेच असते. सकाळी उठल्यापासून त्यांना गावचीच काळजी लागलेली असते. गावात पाऊस किती झाला, पेरणी कशी झाली, पीक कसे आहे, सोसायटीचे काय चालले आहे, गावात कुणाचे काय चालले आहे, याची ते रोज फोन करून चौकशी करत असतात. त्यांचे शरीर शहरात असले तरी मन अजूनही इटाच्या वाड्यातच रेंगाळत असते. गावावर त्यांचे नितांत प्रेम आहे आणि गावाचेही त्यांच्यावर तितकेच प्रेम आहे.आजच्या काळात जेव्हा तरुण पिढी गाव सोडून शहराकडे धाव घेत आहे, तेव्हा वाल्मिक साहेबांचे जीवन हे एक आदर्श उदाहरण आहे. मोठ्या वाड्यात जन्माला येऊनही कधीही गर्व न करणे, सरकारी नोकरीत कृषी विस्तार अधिकारी म्हणून मोठ्या पदापर्यंत जाऊनही साधेपणा न सोडणे, आणि कितीही अडचणी आल्या तरी गावाची माती न सोडणे, हे गुण आज दुर्मिळ होत चालले आहेत. वाल्मिक साहेबांनी हे गुण केवळ बोलून नाहीत, तर जगून दाखवले आहेत. म्हणूनच ते केवळ एक व्यक्ती नाहीत, तर आमच्या गावच्या संस्कृतीचा, साधेपणाचा, प्रामाणिकपणाचा आणि आपुलकीचा एक जिवंत दस्तऐवज आहेत. इटाच्या वाड्यातून घडलेले हे व्यक्तिमत्व पुढील पिढ्यांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहील.

डॉ. शिवाजी हुसे
('सुखनाकाठची माणसं' या लेखमालेतील लेख)

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ नोव्हेंबर २०२६

श्रीकृष्ण महाविद्यालयाचा एक दीप मदतीचा



गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आज महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावातील शेतकऱ्यांसाठी व गरजूंच्या मदतीसाठी गुंजोटी गावातून एक मदत फेरी काढण्यात आली.कोरडा दुष्काळ,पाण्याचे दुर्भिक्ष्य ,हातातून गेलेले पीक अशा अवस्थेत हतबल झालेल्या शेतकऱ्यांसाठी व त्याचबरोबर शेतमजुरासाठी समाजाकडून आणि विविध संस्थेकडून कांहीतरे देणे गरजेचे असते .त्यामुळे केवळ आर्थिक मदतीपेक्षा दिवाळी फराळ,कपडे आणि शैक्षणिक साहित्याच्या मदतीचे आवाहन करण्यात आले.केलेल्या या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत समाजात दानशूर व्यक्तीची आजही कमी नसल्याचे जाणवून आले,यावेळी समाजातील अनेक घटकांनी ,व्यक्तींनी आपल्या परीने मदत केली.यावर्षी महाराष्ट्र आणि विशेषतः मराठवाडा विभागात पावसाचे प्रमाण अत्यंत अल्प व कमी असल्यामुळे दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आणि शेतमजूर बांधव अडचणीत सापडले आहेत. अल्पभूधारक शेतकऱ्यांची अवस्था तर अत्यंत वाईट आहे.अशा अडचणीच्या प्रसंगी समाजातील गरजू घटकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे आद्य कर्तव्य आहे .हाच सामाजिक बांधिलकीचा विचार डोळ्यासमोर ठेवून,श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून "एक दीप मदतीचा शेतकरी व गरजूंसाठी" या उदात्त भावनेतून हा विशेष उपक्रम राबविण्यात आला.त्यात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच समाजातील दानशूर व्यक्ती सामाजिक संस्था यांच्याकडून , दिवाळी फराळ, नवीन कपडे व शैक्षणिक साहित्य जमा करून, महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या कदेर या गावातील गरजू कुटुंबांना ही दिवाळी भेट लवकरच देण्यात येणार आहे.नवीन कपडे व शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे असे मदतीत अनुस्युत आहे. सर्व साहित्य संकलन व वितरण प्रक्रिया दिनांक 06 नोव्हेंबर 2026 पर्यंत पूर्ण करून त्यांची दिवाळी आनंदात साजरी करण्याचा प्रयत्न श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने करण्यात येत आहे. या सामाजिक उपक्रमास प्राधान्य देऊन श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड,राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक आणि कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. मल्लमा आंबुसे,प्रा.डॉ.बालाजी कोनाळे,प्रा. डॉ.भाऊसाहेब उगले यांनी अत्यंत हिरीरीने पुढाकार घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना संचालकाच्या निर्देशाप्रमाणे आवश्यक ते नियोजन करत समाजातील सर्व स्तरातील घटकांचा विशेष सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळवला. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी , विशेषतः राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

दौलताबाद घाटातील डोंगराला भीषण आग; मोठ्या प्रमाणात वनसंपदा जळून खाक



दौलताबाद (जावेद अहमद) : घाट परिसरातील कालिका माता मंदिराजवळील डोंगराला आज बुधवार, 4 नोव्हेंबर रोजी दुपारी दोन ते तीन वाजेच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. डोंगरावरील वाळलेले गवत आणि घाटात वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यामुळे आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले. डोंगर परिसरात वेगाने पसरलेल्या या वनव्यामध्ये मोठ्या प्रमाणात वनसंपदा जळून खाक झाली आहे.सदर परिसर माळीवाडा वनक्षेत्र तसेच गायरान क्षेत्रात येतो. दुपारच्या वेळी वाऱ्याचा वेग अधिक असल्याने आणि डोंगरावरील गवत व झाडेझुडपे पूर्णपणे वाळलेली असल्याने आगीने वेगाने पेट घेतला. वाऱ्याच्या दिशेने आग पसरत गेल्याने काही वेळातच संपूर्ण डोंगर आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यातघटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या गाडीलाही पाचारण करण्यात आले होते. वनविभागाचे वनरक्षक बी. एल. फंड, वनपाल मनोज उदार, वनमजूर प्रभाकर हजारे यांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.यावेळी कालिका माता मंदिराचे पुजारी सुभाष गवळी, पवन गवळी तसेच स्थानिक ग्रामस्थ मदन केदारे, रघुनाथ सोनवणे, भीमराव विनायत, हजुर शेख आदींनी आग विझवण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. वनविभागाचे कर्मचारी, अग्निशमन दल आणि ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे तब्बल चार ते पाच तासांच्या अथक परिश्रमानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले.वन्यजीवांचे मोठे नुकसानया भीषण आगीत डोंगरावरील मोठ्या प्रमाणातील गवत, मौल्यवान झाडेझुडपे आणि नैसर्गिक वनसंपदा जळून नष्ट झाली आहे. या परिसरात वास्तव्यास असलेल्या अनेक पशुपक्षी व सरपटणाऱ्या प्राण्यांचा अधिवास उद्ध्वस्त झाला असून वन्यजीवांचेही मोठे नुकसान झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.डोंगराळ भागातील वाळलेल्या गवतामुळे उन्हाळ्यापूर्वीच अशा प्रकारे वनव्याचा धोका निर्माण झाल्याने, आगामी काळात वनक्षेत्रात विशेष खबरदारी आणि सुरक्षा उपाययोजना करण्याची तीव्र गरज या घटनेमुळे अधोरेखित झाली आहे, अशी माहिती वनपाल मनोज उदार यांनी दिली

बीडमध्ये कर्जमुक्ती योजनेतून ५७,८७३ शेतकऱ्यांच्या खात्यात ५८९.९३ कोटी जमा

बीड (भगवंत पाळवदे) : महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-2026' अंतर्गत बीड जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. शासनाने जाहीर केलेल्या चौथ्या यादीनुसार जिल्ह्यातील 57,873 पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर तब्बल 589 कोटी 93 लाख रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, शासनाच्या या महत्त्वपूर्ण योजनेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. चौथ्या यादीतील लाभ दि. 4 नोव्हेंबर 2026 रोजी जाहीर झालेल्या चौथ्या यादीत बीड जिल्ह्यातील 57,873 शेतकऱ्यांना 589.93 कोटी रुपयांचा लाभ मिळाला आहे. यामध्ये बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून पीक कर्ज घेतलेल्या 1,487 शेतकऱ्यांचे 6.95 कोटी रुपये, तर उर्वरित रक्कम राष्ट्रीयकृत बँका व महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली आहे. यापूर्वी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या यादीमधील राष्ट्रीयकृत बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या 1,10,878 शेतकऱ्यांच्या एकूण 918.56 कोटी रुपयांच्या कर्जमुक्तीला मंजुरी मिळाली होती. आतापर्यंत बीड जिल्ह्यातील एकूण 1,68,751 शेतकऱ्यांना 1508.49 कोटी रुपये इतक्या विक्रमी रकमेची कर्जमुक्ती या योजनेमुळे मिळाली आहे. शासनाच्या या योजनेचा लाभ मिळावा यासाठी यापूर्वी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या यादीतील एकूण 204,366 थकीत पीक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांची नावे जाहीर झाली होती, त्यापैकी आतापर्यंत 175,429 शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. अद्यापही जिल्ह्यातील 28,937 शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केलेले नाही. यापैकी तब्बल 11,080 शेतकऱ्यांकडे 'फार्मर आयडी' (Farmer ID) उपलब्ध नाही. ज्या शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण बाकी आहे, त्यांनी तात्काळ आपले आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन मा. जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी केले आहे.

नीती आयोगाच्या 'आकांक्षित जिल्हा व तालुका' कार्यक्रमांतर्गत बीडमध्ये 'आकांक्षा हाट'चे उद्घाटन



बीड (भगवंत पाळवदे) : नीती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रमांतर्गत बीड जिल्हा परिषद आवारात 'आकांक्षा हाट' (वोलक फॉर लोकल) या दोन दिवसीय विक्री प्रदर्शनाचे आणि महोत्सवाचे दिमाखात उद्घाटन झाले. बीडचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन (IAS) यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.उद्घाटन समयी आपल्या मनोगतात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी, जिल्ह्यातील शेतकरी आणि महिला स्वयंसहाय्यता गटांनी शासकीय योजनांचा लाभ घेत विविध उद्योगांच्या माध्यमातून आपले आर्थिक जीवनमान उंचावण्याचे आवाहन केले. "दुष्काळ असो वा कोणतेही मोठे संकट, जेव्हा नारीशक्ती एकत्रित उभी राहते, तेव्हा विजय निश्चित असतो," असा प्रेरणादायी संदेश त्यांनी यावेळी दिला.या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक विलास जाधव, गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, गटविकास अधिकारी अशोक बाराखोते वडवणी, जिल्हा व्यवस्थापक आशा पवार, जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी राजेश्वर कदम, जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती शीला मिसाळ, कृषी विकास अधिकारी साहिल सय्यद यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, शेतकरी, ग्रामसखी, महिला स्वयंसहाय्यता गटातील सदस्य, आशा व अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जितन रहमान यांनी कार्यक्रमात बोलताना महिला गटांच्या उत्पादनांचे भरभरून कौतुक केले. 'उमेद' (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोमी अभियान) अंतर्गत स्थापित तसेच विविध विभागांतील गरजू महिला स्वयंसहाय्यता गटांनी तयार केलेल्या दिवाळी फराळाची व विविध वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचे आवाहन त्यांनी बीडकरांना केले. तसेच उत्पादनांचा दर्जा वाढवून ती राष्ट्रीय स्तरापर्यंत कशी पोहोचवावी, याबाबत मार्गदर्शन केले.या दोन दिवसीय (४ व ५ नोव्हेंबर २०२६) प्रदर्शनात ग्रामीण भागातील विविध विभागांचे तब्बल ३० स्टॉल उभारण्यात आले आहेत.

यामध्ये शासकीय माहिती, प्रात्यक्षिके आणि दिवाळी फराळ/साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.याशिवाय, दुष्काळ परिस्थितीमध्ये फळबागांची काळजी कशी घ्यावी आणि पाण्याचे नियोजन कसे करावे, याविषयी GVT मार्फत शेतकऱ्यांना मोफत २५०० पुस्तकांचे वाटप करण्यात आले. बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन महिला व शेतकऱ्यांच्या उत्पादनांची खरेदी करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.सर्व विभागप्रमुखांच्या विशेष सहकार्यामुळे हा कार्यक्रम ग्रामीण महिलांना रोजगार व उद्योग निर्मितीसाठी मोठी मदत ठरणार आहे.